**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला अंतर्गत अधिकारी/कर्मचारी पदांच्या संवर्गनिहाय सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-२८०३४/५/२०२५-MAG-१७A (९९९४५५)**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, विस्तार, मुंबई ४०००३२.**
**दिनांक :- १६ जून, २०२६**

**वाचा:-**

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. असंक-१००१/प्र.क्र.२१/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१० सप्टेंबर २००१.
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. शासाउ-१०.०२/प्र.क्र.२७/२००३/सा.उ., दि.१६ जून २००३.
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१२/प्र.क्र.१४८/६-अे दि.३० ऑक्टोबर,२०१४
४. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक., दि.२९ जून २०१७
५. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज यांचे पत्र क्र. महाबीज/प्रशासन/सहायक/२०२५/५४८ दि.३० मे, २०२५.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना किफायतशीर भावात दर्जेदार व प्रमाणित बियाणे मिळावे यासाठी शासनाने दि.२८.०४.१९७६ रोजी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितची स्थापना केली. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला या कार्यालयाच्या सर्व संवर्गातील नियमित ६८१ पदे व बाह्ययंत्रणेद्वारे ५६ पदे अशा एकूण ७३७ पदांच्या आकृतीबंधास संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात आली होती. वित्त विभागाने संदर्भ क्र. ४ अन्वये सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेवून सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याबाबत सूचना व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला यांनी संदर्भ क्र.५ पत्राव्दारे राज्यातील महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला या कार्यालयाच्या आस्थापनेवरील ७२६ पदांच्या सुधारित आकृतीबंधाबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला या कार्यालयाच्या आस्थापनेवरील नियमित ५६० पदे, अधिसंख्य १०० पदे व बाह्यस्त्रोताद्वारे ६३ पदे अशा एकुण ७२३ पदांचा सुधारीत आकृतीबंधास मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला या कार्यालयाच्या आकृतीबंधामध्ये सुधारणा करुन खालील अटींच्या अधीन राहून नियमित ५६० पदे, अधिसंख्य १०० पदे व बाह्यस्त्रोताद्वारे ६३ पदे अशा एकुण ७२३ पदांचा सुधारित आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. "प्रपत्र-अ" मध्ये आढाव्या अंती मंजूर नियमित पदे दर्शविण्यात आली आहेत.

३. “प्रपत्र-ब” मध्ये अधिसंख्य पदे दर्शविण्यात आली आहेत. गट-क मधील “वाहनचालक” व गट-ड मधील सर्व संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सदर पदांवरील कार्यरत पदे अधिसंख्य म्हणून गणण्यात येत आहेत. अधिसंख्य पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त/मृत व अन्य कारणांमुळे रिक्त झाल्यानंतर सदर पदे भरता येणार नाहीत. अधिसंख्य पदे रिक्त झाल्यानंतर भरता येणार नसल्याने, सदरची पदे रिक्त झाल्यानंतर ५६० नियमित पदांचा आकृतीबंध अस्तित्वात राहील.

४. “प्रपत्र-क" मध्ये, आढाव्या अंती मंजूर ६३ पदे बाह्यस्त्रोताद्वारे दर्शविण्यात आली आहेत.

५. सदर आकृतीबंधामुळे येणारा खर्च महामंडळाने त्यांच्या स्वनिधीतून भागवावा. यासाठी कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करण्यात येणार नाही.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७३/२०२५/सा.उ. दिनांक ०६ जून २०२६ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६१६१७१२३१४२०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KARAD SANTOSH BANSIRAO

Digitally signed by KARAD SANTOSH BANSIRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and ADF Department, 2.5.4.20=F981D5A9FEC2E5D5DC36F39695B5F0E4FF5B340CD5420DF7CBAA28990D692E36, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=90BBB9D3E7E74DE43F8070E2A9A65BFD42747F1995A4F22FDC0240939AAB0835, cn=KARAD SANTOSH BANSIRAO
Date: 2026.06.16 17:14:12 +05'30'

**( संतोष कराड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास), यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक व क्रिडा) यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

५. मा. मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
८. सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य.
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०.अ.मु.स.सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला
१३.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५.जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला
१६.वित्त विभाग (व्यय-१/साउ), मंत्रालय, मुंबई
१७.१७-अे कार्यासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई (निवडनस्ती )

शासन निर्णय क्र. कृवपदुम-२८०३४/५/२०२५-MAG-१७A (९९९४५५) दि.१६ जून २०२६ सोबतचे

**"प्रपत्र- अ"**

| अ.क्र | संवर्ग | वेतनश्रेणी | दि.३०.१०.२०१४ च्या एकुण मंजूर पदे | आढाव्या अंती सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से. प्रतिनियुक्तीने) | एस-२७ १२३१००-२१५९०० | १ | १ | |
| २ | महाव्यवस्थापक (प्रक्रिया) | एस-२७ १२३१००-२१५९०० | १ | १ | |
| ३ | महाव्यवस्थापक (उत्पादन) | एस-२७ १२३१००-२१५९०० | १ | १ | |
| ४ | महाव्यवस्थापक (विपणन) | एस-२७ १२३१००-२१५९०० | १ | १ | |
| ५ | महाव्यवस्थापक (वित्त) | एस-२७ १२३१००-२१५९०० | १ | १ | |
| ६ | महाव्यवस्थापक (प्रशासन) | एस-२७ १२३१००-२१५९०० | १ | १ | |
| ७ | महाव्यवस्थापक (गुणवत्ता नियंत्रण ) | एस-२७ १२३१००-२१५९०० | १ | १ | |
| ८ | उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा) | एस-२४ ७११००-२११९०० | १ | १ | |
| ९ | उपमहाव्यवस्थापक (विपणन) | एस-२४ ७११००-२११९०० | १ | १ | |
| १० | उपमहाव्यवस्थापक (उत्पादन) | एस-२४ ७११००-२११९०० | १ | १ | |
| ११ | उपमहाव्यवस्थापक (प्रक्रिया) | एस-२४ ७११००-२११९०० | १ | १ | |
| १२ | कंपनी सचिव तथा उपमहाव्यवस्थापक (अंतर्गत अंकेक्षण) | एस-२४ ७११००-२११९०० | १ | १ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | उपमहाव्यवस्थापक (गुणवत्ता नियंत्रण व संशोधन) | एस-२४ ७११००-२११९०० | ० | १ | |
| १४ | विभागीय व्यवस्थापक | एस-२३ ६७७००-२०८७०० | ८ | ६ | २ पदे निरसित झाली आहेत. |
| १५ | विभागीय व्यवस्थापक (गुणवत्ता नियंत्रण) | एस-२३ ६७७००-२०८७०० | १ | ० | १ पद निरसित झाले आहे. |
| १६ | जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-१ | एस-२० ५६१००-१७७५०० | १६ | १६ | |
| १७ | जिल्हा व्यवस्थापक (ऊती संवर्धन) | एस-२० ५६१००-१७७५०० | १ | १ | |
| १८ | बीज परिक्षण अधिकारी | एस-२० ५६१००-१७७५०० | १ | १ | |
| १९ | सिस्टीम मॅनेजर | एस-२० ५६१००-१७७५०० | १ | १ | |
| २० | सहायक लेखाधिकारी | एस-२० ५६१००-१७७५०० | ४ | ९ | |
| २१ | वरिष्ठ कृषि अभियंता | एस-२० ५६१००-१७७५०० | ४ | ४ | |
| २२ | वरिष्ठ पैदासकार | एस-२० ५६१००-१७७५०० | २ | २ | |
| २३ | कामगार कल्याण अधिकारी | एस-१६ ४४९००-१४२४०० | १ | ० | १ पद निरसित झाले आहे. |
| २४ | केंद्र अभियंता | एस-१६ ४४९००-१४२४०० | ९ | ८ | १ पद निरसित झाले आहे. |
| २५ | जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी | एस-१५ ४१८००-१३२३०० | २७ | २० | ७ पदे निरसित झाली आहेत. |
| २६ | कनिष्ठ केंद्र अभियंता | एस-१५ ४१८००-१३२३०० | ६ | १२ | |
| २७ | लेखापाल/अंतर्गत अंकेक्षक | एस-१५ ४१८००-१३२३०० | २१ | २४ | |
| २८ | व्यवस्थापकीय संचालकांचे स्वीय सहाय्यक | एस-१५ ४१८००-१३२३०० | १ | १ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | कनिष्ठ अभियंता | एस-१५<br>४१८००-१३२३०० | ४ | ४ | |
| ३० | पैदासकार श्रेणी-२ | एस-१५<br>४१८००-१३२३०० | ० | १ | |
| ३१ | सहायक व्यवस्थापक (कर्मचारी व प्रशासन) | एस-१४<br>३८६००-१२२८०० | १ | १ | |
| ३२ | सुरक्षा अधिकारी | एस-१४<br>३८६००-१२२८०० | ३ | ३ | |
| ३३ | वरिष्ठ लघुलेखक | एस-१४ /३८६००-१२२८०० | १ | १ | |
| ३४ | लघुलेखक निम्न श्रेणी | एस-१४<br>३८६००-१२२८०० | ४ | ० | ४ पदे निरसित झाली आहेत. |
| ३५ | कनिष्ठ पैदासकार | एस-१४<br>३८६००-१२२८०० | ३ | ६ | |
| ३६ | सहायक क्षेत्र अधिकारी/ उपविभागीय स्वयवस्थापक | एस-१४ /३८६००-१२२८०० | १७१ | १०२ | ६९ पदे निरसित झाली आहेत. |
| ३७ | सहायक/भांडारपाल | एस-१३<br>३५४००-११२४०० | २४ | २६ | |
| ३८ | प्रभारी वाहने (व्हेईकल इन्चार्ज) | एस-१३<br>३५४००-११२४०० | १ | ० | १ पद निरसित झाले आहे. |
| ३९ | आरेखक | एस-१३<br>३५४००-११२४०० | १ | ० | १ पद निरसित झाले आहे. |
| ४० | वरिष्ठ यंत्रचालक | एस-८<br>२५५००-८११०० | ३ | ३ | |
| ४१ | माळी | एस-८<br>२५५००-८११०० | १ | १ | |
| ४२ | लिपीक-टंकलेखक | एस-८<br>२५५००-८११०० | ९० | ४७ | ४३ पदे निरसित झाली आहेत. |
| ४३ | प्रयोगशाळा सहायक | एस-८<br>२५५००-८११०० | ७ | २ | ५ पदे निरसित झाली आहेत. |
| ४४ | कृषि सहाय्यक | एस-८<br>२५५००-८११०० | ० | १९० | |
| ४५ | कनिष्ठ लिपीक-टंकलेखक | एस-६<br>१९९००-६३२०० | २३ | ४० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | वाहनचालक | एस-६<br>१९९००-६३२०० | १७ | ० | १६ पदे निरसित करण्यात आली आहेत व १ पद अधिसंख्य करण्यात आले आहे. अधिसंख्य पदे “प्रपत्र-ब” मध्ये दर्शविण्यात आली आहेत. |
| ४७ | कनिष्ठ लेखा लिपिक | एस-६<br>१९९००-६३२०० | ० | १५ | |
| ४८ | कनिष्ठ प्रक्रिया सहायक | एस-३<br>१६६००-५२४०० | ९२ | ० | ४० पदे निरसित करण्यात आली आहेत व ५२ पदे अधिसंख्य करण्यात आली आहे. अधिसंख्य पदे “प्रपत्र-ब” मध्ये दर्शविण्यात आली आहेत. |
| ४९ | कनिष्ठ यंत्रचालक | एस-३<br>१६६००-५२४०० | ४५ | ० | ११ पदे निरसित करण्यात आली आहेत व १९ पदे अधिसंख्य करण्यात आली आहे. अधिसंख्य पदे “प्रपत्र-ब” मध्ये दर्शविण्यात आली आहेत. |
| ५० | मदतनीस | एस-३<br>१६६००-५२४०० | २ | ० | २ पदे निरसित करण्यात आली आहेत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५१ | शिपाई-पहारेकरी | एस-१<br>१५०००-४७६०० | ७२ | ० | ४४ पदे निरसित करण्यात आली आहेत व २८ पदे अधिसंख्य करण्यात आली आहे. अधिसंख्य पदे “प्रपत्र-ब” मध्ये दर्शविण्यात आली आहेत. |
| ५२ | सहायक माळी | एस-१<br>१५०००-४७६०० | १ | ० | |
| **एकुण पदे** | | | **६८१** | **५६०** | |

“प्रपत्र- ब”

| अ.क्र | संवर्ग | अधिसंख्य पदे |
|---|---|---|
| १ | वाहनचालक | १ |
| ३ | कनिष्ठ प्रक्रिया सहायक | ५२ |
| ४ | कनिष्ठ यंत्रचालक | १९ |
| ६ | शिपाई-पहारेकरी | २८ |
| **एकुण पदे** | | **१००** |

“प्रपत्र- क”

| अ.क्र | संवर्ग | बाह्यस्त्रोत पदे |
|---|---|---|
| १ | विधी अधिकारी | १ |
| २ | उपकार्यकारी अभियंता (कंत्राटी किंवा सेवानिवृत्त) | १ |
| ३ | लघुलेखक निम्न श्रेणी | १ |
| ४ | वाहनचालक | १२ |
| ५ | फोर्कलिफ्ट चालक | १५ |
| ६ | कनिष्ठ यंत्रचालक | १५ |
| ७ | शिपाई-पहारेकरी | १५ |
| ८ | सहायक माळी | ३ |
| **एकुण पदे** | | **६३** |